पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - **०९**
सभावृत्तांत

दिनांक- **०४/०१/२०१७** वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची बुधवार दिनांक ०४/०१/२०१७ रोजी दुपारी ३:०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर – अध्यक्षा**
२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
३. मा.सुरेखा शंकर गव्हाणे
४. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
५. मा.सोमवंशी प्रकाश बबनराव - स्विकृत सदस्य
६. मा.आहेर संजय निवृत्ती- स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.चंद्रकांत इंदलकर – क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) मा.प्रविण अ. घोडे - कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.जयंत बरशेट्टी – कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.व्ही.सी.काळे - उपअभियंता (स्थापत्य), मा.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), मा.अंकुश कोंडे -उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.लांडे बी.पी. उपअभियंता (विद्युत), मा.श्री.शितोळे एस.बी.-क.अभियंता (ज.नि), मा.श्री.टी.एच.दाते-सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.विजय खाडे, उप.अभियंता, मा.श्री.कोतकर पी.बी. क.अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.बगली एस.ए. क.अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.व्ही.एस.राऊत-क.अभियंता, मा.श्रीम.पी.आर.देसाई-क.अभियंता (पाणीपुरवठा),मा.श्री.दिग्विजय पवार-क.अभियंता (पाणीपुरवठा) मा.श्री.निखील फेंडर- क.अभियंता (स्थापत्य उद्यान), मा.श्री.धडस ए.आर.- क.अभियंता (जलनि:सारण), मा.पांचाळ बी.के.क.अभियंता, श्री.सी.जे.देसले - क.अभियंता श्री.अहिरे एस.एन., मा.श्री.जी.एस.खैरे – स.उद्यान अधिक्षक, (पशुवैद्यकिय) मा.श्री. नाडेकर बी.के. सहा.शिक्षक भोसरी, श्री.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक लांडेवाडी, श्रीमती पवळे जयश्री रविंद्र- समुह संघटक, नागरवस्ती.

------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

त्यानंतर  खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

-----

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी                    अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे या आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी **मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर** यांची  निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

------

**मा.अध्यक्षा -** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत  येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**------**

विषय क्रमांक  १.गव्हाणेवस्ती, भोसरी (वॉर्ड क्र.३४) या ठिकाणी शनि मंदीराजवळील परिसराला जय महाराष्ट्र मंडळाजवळ **" शनी महाराज मंदीर"** चौक असे नामकरण करणेबाबत मा.प्रकाश सोमवंशी – स्विकृत सदस्य यांचे पत्र.

विषय क्रमांक  २.नामकरणाबाबत. (चौकास) मा.सौ.सुरेखाताई गव्हाणे यांचे पत्र.

विषय क्रमांक  ३.स्वागत कमान उभारण्याबाबत (कै.कोंडिबाभाऊ देवकर स्वागत कमान) मा.सुनिता (माई) गवळी  यांचे दिनांक ०४/०१/२०१७ चे पत्र.

विषय क्रमांक  ४.नांव देण्याबाबत. मा.विनया तापकीर यांचे  पत्र.

विषय क्रमांक  ५. नांव देण्याबाबत. मा.विनया तापकीर यांचे  पत्र.

विषय क्रमांक  ६.नामकरण करणे बाबत.मा.संजय निवृत्ती आहेर यांचे पत्र.

अ) दिनांक ७/१२/२०१६  रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक- १

दिनांक- - **०४/०१/**२०१**७**

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – सौ.सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचे चे पत्र.

प्रभाग क्र.७, च-होली वडमुखवाडी येथील सर्व्हे.नं.१५३ ते १५७ या जागेला **"मुक्ताईनगर"** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक- २

दिनांक- - **०४/०१/**२०१**७**

सूचक- मा. मा.विनया तापकीर अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – कलम २०५ अंतर्गत वहिवाटीसाठी रस्ता करणेबाबत.मा.विनया तापकीर यांचे पत्र.

च-होली बु.शिवाजी चौक, कोतवालवाडी येथे मारुती भोसले हे अपंग व्यक्ती राहत असून त्यांना त्यांचे घरी जाणे-येणेसाठी १० फुट रुंद रस्त्याची आवश्यकता आहे. सध्या मारुती भोसले यांचे घराकडे जाणे-येणेसाठी रस्ता उपलब्ध नाही त्यामुळे त्यांची गैरसोय होत आह. तरी मारुती भोसले हे अपंग व्यक्ती असल्याने त्यांना म.न.पा.तील सुविधा देणेसाठी शिवाजी चौक ते त्यांचे स्वत:चे घरापर्यंत कलम २०५ नुसार १० फुट रुंद रस्ता उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक- १

दिनांक- - **०४/०१/**२०१**७**

सूचक- मा.प्रकाश सोमवंशी अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – गव्हाणेवस्ती, भोसरी (वॉर्ड क्र.३४) या ठिकाणी शनि मंदीराजवळील परिसराला जय महाराष्ट्र मंडळाजवळ **" शनी महाराज मंदीर"** चौक असे नामकरण करणेबाबत मा.प्रकाश सोमवंशी – स्विकृत सदस्य यांचे पत्र.

वॉर्ड क्र.३४ (जुना) गव्हाणेवस्ती येथील शनी मंदीर परिसर अतिशय भव्य असा आहे तरी या चौकास सुशोभीत करुन चौकास **" शनी महाराज मंदीर"** चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक- २

दिनांक- - **०४/०१/२०१७**

सूचक- मा. सौ.सुरेखा गव्हाणे अनुमोदक – मा.प्रकाश सोमवंशी

संदर्भ – नामकरणाबाबत (चौकास) मा. सौ.सुरेखा गव्हाणे यांचे दिनांक ४/१/१७ चे पत्र.

भोसरी येथील गव्हाणेवस्ती वॉर्ड क्र. ३४ (जुना) आदि नाथनगर येथील अजिंक्य मित्र मडळ चौकास **"अजिंक्य चौक"** असे नामकरण होऊ चौकाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक- ३

दिनांक- - **०४/०१/२०१७**

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा.सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – स्वागत कमान उभारण्याबाबत (कै.कोंडिबाभाऊ देवकर स्वागत कमान)
मा.सुनिता (माई) गवळी यांचे दिनांक ०४/०१/२०१७ चे पत्र.

चक्रपाणी वसाहत देवकर वस्ती सदर वस्ती खूप वर्षापासून वास्तव्यास असून तरी देखील महानगरपालिकेच्या वतीने स्वागत कमान उभारली नाही. तरी चक्रपाणी वसाहत देवकर वस्ती येथे **"कै.कोंडिबाभाऊ देवकर"** स्वागत कमान उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक- ४

दिनांक- - **०४/०१/२०१७**

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा.सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – नांव देण्याबाबत. मा.विनया तापकीर यांचे पत्र.

च-होली बु येथील महानगरपालिकेच्या माध्यमातून जिमनास्टीक क्रीडांगण भुमीपूजन झालेले आहे. जिमनास्टीक व क्रीडांगण जागा उपलब्ध करुन देण्यास मा.कै.शांताराम हरिभाऊ काटे यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांचे सामाजिक कार्य पाहून त्यांचे जिमनास्टीक व क्रीडांगणला त्यांचे नांव दिले तर अधिक चांगले प्रेरणादायी होईल च-होली बु येथील जिमनास्टीक व क्रीडांगणला मा **"कै.शांताराम हरिभाऊ काटे"** नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक- ५

दिनांक- - **०४/०१/**२०१**७**

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा.सौ.सुरेखा गव्हाणे

**संदर्भ –** नांव देण्याबाबत. मा.विनया तापकीर यांचे पत्र.

काळजेवाडी येथील महनगरपालिकेच्या माध्यमातून प्राथमिक शाळेचे बांधकाम झालेले आहे. त्या शाळेल जागा उपलब्ध करुन देण्यास मा.कै.पोपटराव विठ्ठल काळजे यांचे फार मोठे योगदान आहे. तरी त्यांचे सामाजिक कार्य पाहून त्यांचे शाळेला नांव दिले तर अधिक चांगले प्रेरणादायी होईल तरी काळजेवाडी येथील शाळेला **"मा.कै.पोपटराव विठ्ठल काळजे"** नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक- ६

दिनांक- - **०४/०१/**२०१**७**

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा.प्रकाश सोमवंशी

**संदर्भ –** नामकरण करणे बाबत.मा.संजय निवृत्ती आहेर यांचे पत्र.

संतनगर येथील गजानन चौक, से.नं.४ व से.नं. ६ मधील रोडला छत्रपती श्री. शिवाजी महाराज रस्ता असे नामकरण करणेस तसेच स्पाईन रोड शेजारील सर्कलला नवीन पोलीस स्टेशनजवळील **"गुड मॉर्निंग सर्कल"** असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**मा. अध्यक्षा -** यानंतर मा. अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्षा
विनया प्रदिप (आबा) तापकीर
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/९५/२०१७
दिनांक- **०७/०१/**२०१७.

प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक ०४/०१/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.विनया तापकीर –** लक्ष्मीनगर येथे योजना राबविली होती तिथे बरेच प्रोब्लेम आहेत. तेथील काही पाईप लाईन लिकेज आहेत. काटेवस्तीमध्ये पाण्याचा प्रोब्लेम आहे. पाणी प्रेशरने येत नाही. वडमुखवाडी, च-होली येथे पिण्याच्या पाण्याचा खूपच प्रोब्लेम आहे. तुम्ही पाण्याच्या टँकरची व्यवस्था करीत नाही.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्य.अभियंता,पाणीपुरवठा) -** सकाळी ८.०० ते ९.०० व ९.०० ते १०.०० या वेळेत पाणी देत आहोत. उशिरा का होईना पाणी देत आहोत. पाणी कमी वेळ पण रोज पाणी देत आहोत. गेले काही दोन दिवस कामे चालू होती. आता काम पुर्ण झाल्यावर पाणी सुरळीत चालू होईल. एअर ब्लॉक झाले होते. आता ते व्यवस्थित झालेले आहेत. काही पाण्याचे कनेक्शन उंचावर असल्यामुळे पाण्याचा प्रोब्लेम असेल. परंतू आता पाणी वेळेत व व्यवस्थित येईल.

**मा.सुरेखा गव्हाणे** – कामे किती झालेली आहेत. किती कामाचे आदेश दिलेले आहेत. मला माहिती पाहिजे.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्य.अभियंता,पाणीपुरवठा) –** नवीन साहेब आलेले आहेत त्यांचेकडून माहिती घेऊन देण्यात येईल.

**मा.विनया तापकीर –** नवीन पाईप लाईन टाकणे व पाणी वेळेत व प्रेशरने देणे ही कामे प्राधान्याने करुन दयावीत. आमची नेहमीची अडचण दूर करावी.

**मा.संजय आहेर –** से.नं.४ मध्ये पाण्याचा प्रेशर फार कमी आहे.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्य.अभियंता,पाणीपुरवठा) –** एअर ब्लॉक असल्यामुळे पाणी पुर्णपणे येत नाही. पाईप लाईन ब्लॉक झाली होती. त्यामुळे पाण्याचा प्रेशर कमी येतो.

**मा.विनया तापकीर -** वर्कऑर्डर दिली आहे ते काम ठेकेदारामार्फत चालू करा. फार तक्रारी येत आहेत. कामे चालू केली आहेत ती बंद आहेत. अशी सर्व कामे चालू ठेवणे गरजेचे आहे.

**मा.सुनिता (माई) गवळी** – हनुमाननगर कॉलनीचे काम चालू आहे. परंतू खड्डे खूप ठेवले आहे ते काम लवकर करण्यात यावे.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्य.अभियंता,पाणीपुरवठा) –** सद्गुरुनगर येथे पाईप लाईन टाकलेली आहे ते काम करण्यात येईल. त्यानंतर हनुमानगर येथील काम दोन दिवसात करण्यात येईल.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमध्ये काही ठिकाणी खूप कमी पाणी मिळत आहे.

**मा.विनया तापकीर –** सगळीकडे पाण्याची अडचण आहे. त्यासाठी काय उपाययोजना करता येईल. सर्व कामे वेळेवर झाली पाहिजे.

**मा.सुनिता (माई) गवळी** – जोपर्यंत इ प्रभागाजवळची पाण्याची टाकीचे काम पुर्ण होत नाही तोपर्यंत पाण्याची व्यवस्था होणार नाही.

**मा.सुरेखा गव्हाणे -** सगळीकडे कागद पडलेले असतात. त्यासाठी कचराकुंडीचे व्यवस्था करण्यात यावी.

**मा.टी.एच.दाते (सहा.आरोग्य अधिकारी)-** आरोग्य विभागाच्या कर्मचा-यांकडून दोन वेळा कचरा उचलला जातो.

**मा.संजय आहेर –** स्टलिंग स्कुलजवळील बॅडमिंटन हॉल चालू करण्यात यावा.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** क्रीडा विभागाच्या संबंधीत कर्मचा-यांशी बोलून घेतो.

**मा.विनया तापकीर-** पद्मावती मंदीर येथील ड्रेनेजचे काम लवकर करण्यात यावे. माझे वॉर्डमधील कामे प्राधान्याने करण्यात यावी.

**मा.श्री.शितोळे एस.बी.-क.अभियंता (ज.नि)** – च-होली येथील कामे लवकरच करण्यात येईल. काटेवस्तीमध्ये सध्या काम चालू आहे.

**मा.विनया तापकीर –** वडमुखवाडी, आझादनगर,व काटेवस्ती ही सर्व कामे करण्यात यावी. दाभाडेवस्तीचेही काम करण्यात यावे. गुळवेवस्ती येथे जो खड्डा आहे ते काम करण्यात यावे.

**मा.श्री.शितोळे एस.बी.-क.अभियंता (ज.नि) –** वर्कऑर्डर झाली आहे. ते काम करण्यात येईल.

**मा.विनया तापकीर-** विद्युत विभागाकडून लाईटचे काम करण्यात यावे.

**मा.प्रविण घोडे – (कार्य.अभियंता विद्युत) –** LCD बाबत पत्र आले आहेत. अजून LED आलेले नाही. दोन तीन दिवसात लाईटचे काम करुन देण्यात येईल**.**

**मा.सुरेखा गव्हाणे – माझे येथील गार्डनेचे काम करण्यात यावे.**

मा.व्ही.सी.काळे (उपअभियंता स्थापत्य)- आपले वॉर्डमधील सर्व कामे झाली आहेत.

**मा. अध्यक्षा -** आजच्या मिटींगला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानते. व त्यानंतर सभा संपल्याचे जाहीर केले.